DAY —— **19** SEAT NUMBER | | | | | | |

| 2024 | III | 15 | 1500 | J-971 | (M) |
|---|---|---|---|---|---|

# GEOGRAPHY (39)

**Time : 3 Hrs.** **(7 Pages)** **Max. Marks : 80**

**सूचना :** *(१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*

*(२) प्रश्नांची उत्तरे लिहिताना आवश्यक तेथे योग्य आकृत्या / आलेख काढावे.*

*(३) रंगीत पेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.*

*(४) नकाशा स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.*

*(५) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.*

*(६) नकाशा पुरवणी मूळ उत्तरपत्रिकेस जोडावी.*

**प्र. १.** दिलेल्या सूचनेनुसार खालील उपघटक सोडवावेत. **[ २० ]**

**( अ )** साखळी पूर्ण करून उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा : (५)

| अ. नं. | 'अ' | 'ब' | 'क' |
|---|---|---|---|
| (१) | ग्राहकोपयोगी वस्तू | (इ) अटलांटिक महासागर | (म) औषधी उत्पादन |
| (२) | पनामा कालवा | (फ) सुपीक प्रदेश | (न) परिस्थितिकीय संतुलन |
| (३) | मैदाने | (ग) थेट वापरासाठी तयार | (ओ) शेती व्यवसाय विकास |
| (४) | अन्नसाखळी | (ह) अल्पकालीन | (प) पॅसिफिक महासागर |
| (५) | स्थलांतर | (ई) परिसंस्था | (भ) अरबी समुद्र |
| | | (ज) हिंदी महासागर | (र) दीर्घकालीन |

**( ब )** 'बरोबर' की 'चूक' ते लिहा : (५)

(१) ग्रामीण भागातील भूमी उपयोजन हे नागरी भागातील भूमी उपयोजनापेक्षा वेगळे असते.

(२) विस्तृत व्यापारी धान्य शेतीचा आकार लहान असतो.

(३) लोहपोलाद उद्योग खनिजांवर आधारित असतात.

(४) द्विराष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय व्यापार हा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा प्रमुख प्रकार आहे.

(५) अलीकडे नकाशे G.I.S.च्या प्रणालीच्या आधारे तयार करतात.

**( क )** अचूक पर्याय / घटक निवडा व विधाने पुन्हा लिहा : (५)

(१) स्थलांतराचे कारण ...
- (अ) नैसर्गिक आपत्ती
- (ब) अंतर्गत स्थलांतर
- (क) बाह्य स्थलांतर
- (ड) ऐच्छिक स्थलांतर

(२) व्यापारी तत्त्वावरील लाकूडतोड ...
- (अ) समशीतोष्ण सूचीपर्णी वने
- (ब) समशीतोष्ण पानझडी वने
- (क) उष्ण कटिबंधीय पानझडी वने
- (ड) विषुववृत्तीय सदाहरित वने

(३) कृषीवर आधारित उद्योग ओळखा ...
- (अ) लोहपोलाद उद्योग
- (ब) साखर उद्योग
- (क) रसायन उद्योग
- (ड) सिमेंट उद्योग

(४) कार्यात्मक प्रदेश ...
- (अ) युरोप
- (ब) दूरदर्शन प्रसारण केंद्राचे क्षेत्र
- (क) पश्चिम बंगाल
- (ड) ॲमेझॉन नदी खोरे

(५) ज्यामध्ये १७ खंडाचा समावेश आहे, असा भूगोल विषयाच्या माहितीचा ज्ञानकोश ...

(अ) जिऑग्राफिका

(ब) जिऑग्राफी

(क) गेस-पिरिऑड्स

(ड) कॉसमॉस

**(ड)** पुढील चुकीचा घटक ओळखा : (५)

(१) अक्षांशाशी थेट संबंध नसलेला प्राथमिक आर्थिक व्यवसाय –

(अ) लाकूडतोड (ब) मासेमारी

(क) खाणकाम (ड) शेती

(२) खनिजावर आधारित उद्योग –

(अ) पेट्रोकेमिकल्स

(ब) लोहपोलाद उद्योग

(क) लोकरीचे कापड निर्मिती उद्योग

(ड) ॲल्युमिनिअम उद्योग

(३) प्रदेशाची वैशिष्ट्ये –

(अ) स्थान

(ब) भौगोलिक विस्तार

(क) राजकीय पक्ष

(ड) सीमा

(४) भूगोल अभ्यासकाची कौशल्ये –

(अ) विदा संकलन

(ब) वनसंवर्धन

(क) अहवाल लेखन आणि निष्कर्ष सादरीकरण

(ड) नकाशा काढणे

(५) प्राकृतिक भूगोलाच्या शाखा –

(अ) भूशास्त्र

(ब) मृदाशास्त्र

(क) हवामानशास्त्र

(ड) लोकसंख्या भूगोल

**प्र. २. खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा ( कोणतेही चार ) :** [१२]

(कोणतेही तीन मुद्दे)

(१) लोकसंख्या वितरण असमान असते.

(२) लोकसंख्येतील साक्षरतेचे प्रमाण हे देशाच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे द्योतक असते.

(३) कॅनडामध्ये लाकूडतोडीचा विकास झाला आहे.

(४) दक्षिण अमेरिकेतील उद्योगांच्या विकासाला अवरोध करणारे अनेक घटक आहेत.

(५) तृतीयक आर्थिक क्रियामध्ये सेवा आणि विनिमय यांचा समावेश होतो.

(६) प्रादेशिक विकास हा प्राकृतिक रचनेवर अवलंबून असतो.

**प्र. ३. खालील फरक स्पष्ट करा ( कोणतेही तीन ) :** [९]

(१) देणारा प्रदेश आणि घेणारा प्रदेश

(२) केंद्रित वस्ती आणि विखुरलेली वस्ती

(३) खाणकाम व मासेमारी

(४) जल वाहतूक व हवाई वाहतूक

(५) प्राकृतिक प्रदेश व राजकीय प्रदेश

**प्र. ४. ( अ )** दिलेल्या जगाच्या नकाशात पुढील माहिती भरा (कोणतेही सहा) [११]

(सूची आवश्यक) : (६)

(१) ऑस्ट्रेलियातील जास्त लोकसंख्येचा प्रदेश

(२) भारतातील सर्वाधिक लिंग-गुणोत्तर असलेले राज्य

(३) डॉगर बँक मत्स्यक्षेत्र

(४) दक्षिण आफ्रिकेतील एक औद्योगिक प्रदेश – किंबर्ले


(५) पंचमहासरोवराजवळील औद्योगिक प्रदेश

(६) सागरी वाहतुकीत क्रांतिकारक बदल करणारा सुएझ कालवा

(७) भारतातील एक आंतरराष्ट्रीय विमानतळ – मुंबई

(८) पनामा सामुद्रधुनी

**(ब)** दिलेल्या आलेखाचे वाचन करून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा : (५)



प्रश्न :

(१) कोणत्या देशाचा स्त्री प्रौढ साक्षरता दर खूप कमी आहे?

(२) दिलेल्या तीन प्रदेशात प्रौढ साक्षरता दरात पुरुषांची टक्केवारी अधिक असण्याचे कारण काय असावे?

(३) २०१६ मधील प्रौढ साक्षरता दरात सहारा वाळवंटी प्रदेशात स्त्री-पुरुष टक्केवारी कमी का आहे?

(४) आलेखातील स्त्री प्रौढ साक्षरता दरा विषयी स्वमत लिहा.

(५) आलेखतील कोणता देश सामाजिक दृष्ट्या प्रगत असेल?

**प्र. ५. खालीलपैकी संक्षिप्त टिपा लिहा ( कोणत्याही तीन ) : [१२]**

(१) नागरी वस्त्यांचे कार्याधारित प्रकार

(२) स्थानमुक्त उद्योग

(३) व्यापारातील वाहतुकीची भूमिका

(४) भारतातील प्रादेशिक असमतोल कमी करण्याचे धोरण

(५) भूगोलातील आधुनिक कल

**प्र. ६.** **( अ )** खालील उताऱ्याचे वाचन करून प्रश्नांची उत्तरे लिहा : (४) **[८]**

सर्वांच्या ठिकाणी सामान्यपणे अस्तित्वात असणारी व सहजपणे सर्वांच्या बाबतीत कार्यकारी करता येण्यासारखी प्रेरणा, ही आर्थिक प्रेरणा होय. उत्पादनाच्या क्षेत्रात या प्रेरणेस चालना देण्यासाठी आर्थिक प्रोत्साहनांचा वापर करण्यात येतो. श्रमिक आणि भांडवलदार यांनी अधिक उत्साहाने काम करावे आणि उत्पादनवाढ व्हावी, या उद्देशाने ही प्रोत्साहने दिली जातात. आर्थिक प्रोत्साहनां खेरीज सत्तेची लालसा, नावलौकिकाची इच्छा, विशुद्ध सेवाभाव, देशभक्ती, यासारख्या प्रेरणांनीही मनुष्य उत्साहाने कामास लागू शकतो. किंबहूना प्रत्येकाच्या कार्य करण्याच्या वृत्तीमध्ये अशा सर्व प्रेरणांची कमी अधिक सरमिसळ असते. असे असले तरी आर्थिक प्रेरणा ही महत्त्वाची प्रेरणा होय.

आर्थिक प्रोत्साहनाचे विविध प्रकार असू शकतात: नियुक्त काम ठरलेल्या वेळेपेक्षा आधी पूर्ण केले, तर त्यासाठी विशेष मोबदला (बोनस) देण्यात येतो. त्याचा तपशील त्या त्या कामाच्या संदर्भात कामाच्या स्वरूपाप्रमाणे ठरविता येतो.

उत्पादनाचा दर्जा कायम राखून, किमान अपेक्षित उत्पादनापेक्षा अधिक उत्पादन करून दाखविले, तर त्या अधिक उत्पादनासाठीही नेहमीच्या मोबदल्याहून अधिक असा विशेष दराने मोबदला दिला जातो. ज्यावेळी मजुरांमध्ये असंतोष निर्माण न होऊ देता उत्पादनवाढीसाठी निकराने प्रयत्न करावयाचा असतो, त्यावेळी या विशेष मोबदल्याच्या अपेक्षेने मजूर उत्साहाने कार्य करू शकतात. चांगल्या कामाला उत्तेजन दिली जाणारी बढती देखील सामान्यपणे वापरले जाणारे एक आर्थिक प्रोत्साहनच आहे.

प्रश्न :

(१) आर्थिक प्रेरणा म्हणजे काय?

(२) भांडवलदाराचा उत्पादन वाढीसाठी कोणता उद्‌देश असतो?

(३) विशेष मोबदला (बोनस) का देण्यात येतो?

(४) द्‌वितीयक आर्थिक क्रियेतील कुशल आणि अकुशल कामगारात तुलना करा?

**(ब)** आकृती काढून नावे द्या (कोणतेही <u>दोन</u>) : (४)

(१) अविकसित देशाचा लोकसंख्येचा मनोरा

(२) रेषीय वस्ती

(३) भूगोल अभ्यासकाची कौशल्ये

**प्र. ७. सविस्तर उत्तरे लिहा (कोणताही <u>एक</u>) :** **[८]**

(१) लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे मानवी घटक स्पष्ट करा.

(२) सखोल उदरनिर्वाहक शेतीबद्‌दल सविस्तर माहिती लिहा.

◆◆◆